# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०७/२०१८
## दि.२४/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५९७/१८,भादविक ३०६,३५४,३२३,५०४,५०६,१२०(ब) |
| **फिर्यादी** | अमजद शेख,वय-३२ वर्ष,रा.राजीव गांधीनगर,पिंपळे-गुरव,पुणे |
| **आरोपी** | होरून हसन शेख,रा.बारने शाळे जवळ,बोराटेनगर,थेरगाव,पुणे व इतर तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २००३ पासुन वेळोवेळी ते दि.१४/०७/२०१८ रोजी १५/३० वा. पर्यन्त रहातेघरी बारने शाळे जवळ,बोराटेनगर,थेरगाव,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम होरून हसन शेख याने त्याची पत्नी रेश्मा हारून शेख,वय-३५ वर्ष रा.सदर हिचेबरोबर लग्न करून रेश्मा ही त्याचेबरोबर सासरी नांदत असताना,तीचा पती व इतरांनी आपसात संगनमत करून,तीस वेळोवेळी घरगुती कारणावरून तीचेबरोबर भांडणे काढुन,तीस टोचुन बोलुन,तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,रेश्मा हिस तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.बाबरवाकड ९०२८५७५५९६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे २८६/१८,भादविक ४१९,४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२६,रा.वानवडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात तीन व्यक्ती |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे फेबुवारी-२०१७ ते मार्च-२०१८ रोजीचे कालावधीत साळुंखे विहार रोड,वानवडी पुणे येथे ऑनलाईन माध्यमाचे फेसबुकव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात तीन व्यक्ती यांनी फिर्यादीस ऑनलाईन माध्यमातुन फेसबुकव्दारे रिक्वेस्ट पाठवुन त्यांचेशी मैत्री करुन त्यांना मोबाईलब्दारे संपर्क साधुन,फिर्यादीस वाढदिवसाचे महागडे गिफ्ट पाठवायचे सांगुन पार्सलचे खर्च लागेल असे सांगुन,फिर्यादीस वेग-वेळया बॅकेत ८०,०००/- रुपये रक्कम भरण्यास सांगुन,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) भापकर ९०११०५२००५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे २४३/१८, बाल न्याय अधिनियम २०१५ चे कलम ७५,८२ प्रमाणे |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३० वर्षे,रा. परांडेनगर,दिघी,पुणे |
| **आरोपी** | तीन महिला व एक पुरूष शिक्षक,शिक्षीका,व्हाईस प्रिन्सीपल,प्रिन्सींपल व शाळेचे संस्थाचालक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०७/२०१८ रोजी सकाळी ०८/३० ते १४/३० वा.चे दरम्यान पुणे टिंगरेनगर पुणे येथील शाळे मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा हा पुणे टिंगरेनगर,पुणे येथील शाळेमध्ये शिकण्यास असुन,नमुद शाळेतील तीन महिला शिक्षीका व एक पुरूष शिक्षक यांनी फिर्यादी यांचे मुलाचे डोक्यावरचे केस कापुन त्यास विद्रुप केले. तसेच त्याचे वर्गातील सर्व मुलां समोर फिर्यादी यांचे मुलाचे मानसिक व शारिरीक शोषण करुन त्यास क्रुर वागणुक देवुन अपमानीत केले. त्यामुळे त्याला लज्जा उत्पन्न होवुन त्यास मानसिक धक्का बसला. तसेच व्हाईस प्रिन्सीपल यांना फिर्यादी यांनी फोन करुन सदर माहीती दिली असता,त्यांनी फिर्यादी यांनाच उलट बोलुन त्यांना उडवा-उडवीची उत्तरे देवुन,त्याबाबत कोणतीही कारवाई केली नाही. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. एम.बी.जोगन ९९२२८४९१०० |

## दि.२५/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे १२१/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५२,रा.सेनापाती बापट रोड,पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०७/२०१८ रोजी २२/३० वा. बालगंधर्व पुलाचे मध्यभागी डेक्कन,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन, फिर्यादी यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र ४५ हजार रू किमतीचे जबरदस्तीने हिसका मारून,तोडुन चोरून नेले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.के.सोनवणे |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**